## <u>नियमित दिवाणी मुकदमा नं.२६१/२०१३ - निशाणी ११४ लगत आदेश</u>

सुप्रिया प्रकाश मिसाळ वि. रामचंद्र नामदेव मिसाळ इ.

CNR No. MHSO20-001035-2013

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांना वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत. त्यामुळे मे. कोर्टात हजर राहुन वादीचे दुरुस्त दाव्यास कैफियत मुदतीत देणे अशक्य झाले. त्यामुळे सदर प्रतिवादी यांचे विरुध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. दावा स्थावर मिळकतीचे वादासंबंधी असलेमुळे या दाव्याचा गुणानुरूप न्याय निर्णय होणेचे दृष्टीने प्रतिवादी क्र.१ चे विरुध्द झालेला विना कैफियतचा हुकूम रद्द करुन प्रतिवादी यांनी सोबत दिलेली कैफियत स्वीकारणे न्यायाचे हिताचे आवश्यक व गरजेचे आहे अन्यथा यातील प्रतिवादी क्र.१ यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी त्यांचे म्हणणे मांडले की, प्रस्तुतचा अर्ज खरा नाही. तो वादीस मान्य व कबूल नाही. अर्जातील कारण खोटे व लबाडीचे असून वादीस मुळीच मान्य नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी क्र.१ यांनी मुदतीमध्ये वादीचे दुरुस्त दाव्यास कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश झालेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादी यांचे

नुकसान होणार नाही. विलंबाचे कारण लक्षात घेता सदर प्रतिवादी क्र.१ यांचेवर खर्च ठेवणे उचित होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो -

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज (नि.क्र.११४) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द करण्यात येतो.

दिनांक – १६/०७/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला.